# शिवाजी विद्यापीठात हिंदी दिन

## हिंदी अधिविभाग, जायंट्स ग्रुपचा उपक्रम



**आर. के. नगर, ता. १८ :** शिवाजी विद्यापीठातील हिंदी अधिविभागात हिंदी दिन झाला. जायंट्स ग्रुप ऑफ कोल्हापूर यांनीही या उपक्रमात सहभाग घेतला होता.

डॉ.प्रतिभा पाटणकर यांनी हिंदी भाषेचे वैश्विक महत्त्व नमूद केले तसेच भारतीय शिक्षणामधील हिंदी भाषेचे स्थान आणि अस्मिता स्पष्ट केली. डॉ.अर्जुन चव्हाण यांनी हिंदी दिनाचे महत्त्व व आंतरराष्ट्रीय पातळीवर हिंदी भाषेस फार महत्त्व येत आहे याकडे लक्ष वेधले. प्रदीप घाटगे यांनी प्रास्ताविकात हिंदी दिनाचे महत्त्व व हिंदी भाषेच्या आवश्यकते बाबत विचार मांडले. डॉ. महादेव शिंदे यांनी जायंट्स ग्रुपच्या कार्याबद्दल माहिती दिली तसेच हिंदी दिवस का साजरा करायचा हे सांगितले. मिलिटरी हॉस्पिटलचे डॉ. बसगोंडा पाटील यांनी हिंदी राजभाषा असून, तिला राष्ट्र भाषेचे स्थान मिळाले पाहिजे असे नमूद केले. अध्यापक अक्षय भोसले यांनी भाषा सॉफ्टवेअरमधील हिंदीचा गौरव व्यक्त करीत अधिक जागृतीची अपेक्षा व्यक्त केली.

अध्यापक डॉ. गीता दोडमणी यांनी आभार मानले. अध्यापक डॉ. सुवर्णा गावडे, लिपिक हेमंत जाधव, जायंट्सचे माजी अध्यक्ष शहाजी नलवडे, जायंट्सच्या सुवर्णा बंडी, मुग्धा घाटगे आदी उपस्थित होते.

# अंतिम परीक्षेसाठी मोबाईल, ई-मेल अपडेटसाठी मुदतवाढ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

अंतिम वर्षाच्या शेवटच्या सत्रासाठी परीक्षा देणाऱ्या सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना त्यांचा स्वत:चा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी महाविद्यालये, अधिविभागात विद्यापीठाच्या संगणक प्रणालीमध्ये अपडेट करण्यासाठी दि. २१ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

परीक्षा ऑनलाईन होणार असल्याने परीक्षार्थींनी त्यांचा ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक महाविद्यालय, अधिविभागामार्फत विद्यापीठाच्या अधिकृत संगणक प्रणालीत अपडेट करणे गरजेचे आहे.